नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा

(र.नं. एफ – १५६२ द्वारा संचालित)

# जिजामाता कला महाविद्यालय

कृषी महाविद्यालय परिसर, आर्णी रोड, दारव्हा, जि. यवतमाळ

दूरध्वनी – (०७२३८) २५५८६२

NAAC Accredited ( 1st Cycle)

**website :** www.jkmvd.org **I Email :** jkmvd@rediffmail.com



महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२२–२३

अंक अठरावा





नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा
जिजामाता कला महाविद्यालय
दारव्हा
मा श्री माणिकरावजी ठाकरे




जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा
राष्ट्रीय सेवा योजना
हर घर तिरंगा






Sant Gadge Baba Amravati University








नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा

(र.नं. एफ - १५६२ द्वारा संचालित)

# जिजामाता कला महाविद्यालय

कृषी महाविद्यालय परिसर, आर्णी रोड, दारव्हा, जि. यवतमाळ

दूरध्वनी - (०७२३८) २५५८६२

NAAC Accredited ( 1st Cycle)

**website :** www.jkmvd.org I **Email :** jkmvd@rediffmail.com



महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२२-२३

अंक अठरावा

महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२२-२३

**अंक अठरावा**


प्रकाशक



**डॉ. आश्रू पुंजाजी जाधव**

प्राचार्य

मो. ९८५०८५७५०३

संपादक : वार्षिकांक समिती



**प्रा. डॉ. आर.एस. गेडाम**

ग्रंथपाल

मो. ९५९५९७९१९५



**प्रा. डॉ. पी.आर. बांडे**

सहा. प्राध्यापक

समाजशास्त्र विभाग



महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२२-२३

**अंक अठरावा**

**च्या निमित्ताने .....**

महाविद्यालयाच्या शैक्षणिक पूरक उपक्रमातील 'वार्षिकांक' हा युवा विद्यार्थ्यांसाठी आवडीचा व साहित्य गुण सादर करण्याचा हा हक्काचा उपक्रम.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ या 'जिजाऊची लेक' चा अठरावा अंक आपल्यासमोर ठेवताना मला आनंद होत आहे.

ह्या अंकात मोजकेच परंतु वैविध्यपूर्ण तसेच महत्त्वाच्या विषयांवर आधारलेले लेख, विद्यार्थ्यांच्या साहित्यिक प्रयत्नांतून साकारलेल्या कविता, काही संकलने, चारोळ्या असे साहित्य अंतर्भूत केलेले आहे. त्याचा आपण आनंदाने व अधिक चौकस होऊन स्वीकार करावा.

या वार्षिकांकाला आकार देण्यास महत्त्वाची भूमिका वठविणारे आमचे संपादक मंडळ अभिनंदनास पात्र आहे.

आमचे प्रेरणास्थान, नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.श्री. माणिकरावजी ठाकरे, सचिव श्रीमती माधुरीताई पोले, व्यवस्थापक श्री. अशोकराव ठाकरे, मार्गदर्शक श्री. राहुलभाऊ ठाकरे, श्री. अतुलभाऊ ठाकरे यांचे पाठबळामुळेच आमचे कार्य आम्ही अधिक यशस्वी करू शकलो. तसेच व्याख्यातावर्ग, कर्मचारी वृंद, विद्यार्थी व पालक यांचे सहकार्य तथा मुद्रक, सजावट व मांडणीकार श्री गुरूदेव प्रिन्टर्स, अमरावती यांचे अथक परिश्रम यामुळेच 'जिजाऊची लेक' २०२२-२३ चा अठरावा अंक सुंदर साकारला गेला आहे.

व्यक्तिशः सर्वांना अभिवादन करून अंक आपल्या सुपुर्द करीत आहो, धन्यवाद !

**डॉ. आश्रू पुंजाजी जाधव**
प्राचार्य
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा

**टिप : या अंकातील लेख, ललितबंध, काव्य संग्रहणाशी प्रकाशक व संपादन समिती सहमत असेलच असे नाही.**

महाविद्यालयीन वार्षिकांक

# जिजाऊची लेक

२०२२-२३

अंक अठरावा

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| १) | मानाचा मुजरा | ०१ |
| २) | राजे | ०२ |
| ३) | गोष्ट पहिल्या पावसाची | ०३ |
| ४) | फक्त तू खचू नकोस | ०४ |
| ५) | आदर्श माता | ०४ |
| ६) | जन्म दिला तू आई | ०५ |
| ७) | बाबा | ०५ |
| ८) | स्वराज्य | ०६ |
| ९) | शुन्या पासुन विश्व | ०६ |
| १०) | श्रीमंत माणुस | ०७ |
| ०१) | फ्रेंडशिप | ०७ |
| १२) | कालचा आणि आजचा रावण | ०८ |
| १३) | आमचे सर | ०९ |
| १४) | कॉलेज लाईफ | १० |
| १५) | अजाण नातं | १० |
| १६) | मुलीनी वागावे तरी कसे | ११ |
| १७) | शेतकरी गाथा | ११ |
| १८) | नौकरी | १२ |
| १९) | मैत्री | १२ |
| २०) | शेतकरी | १३ |
| २१) | ओवाळणी ... | १४ |
| २२) | पाऊस | १५ |
| २३) | स्त्री | १५ |
| २४) | पाणी म्हणजे जीवन | १६ |
| २५) | असे तेथे नाही | १६ |
| २६) | चंचल मन ... | १७ |
| २७) | वाट पाहत आहे ... | १७ |
| २८) | नातं मैत्रीचं | १८ |
| २९) | धन्य जिजाऊ माता... | १९ |
| ३०) | माझे गाव | १९ |
| ३१) | भुख | २० |
| ३२) | काहीतरी बाकी आहे ! | २० |
| ३३) | माझी बहीण | २१ |
| ३४) | जिवन जगून बघ | २१ |


# मानाचा मुजरा



इतिहास सांगतो आमुचा स्त्रीनेच
शत्रू तुडवला!
**माँ जिजाऊने**
राजा शिवछत्रपती घडवला !!!
**लक्ष्मीबाईने**
झाशीचा किल्ला लढवला !!
**महाराणी ताराबाईने**
महाराष्ट्र भूमीत औरंगजेब रडवला !!
स्त्री म्हणजे जन्मदाती,
स्त्री म्हणजे संस्कृती,
स्त्री म्हणजे नाविन्याचा वसा,
स्त्री म्हणजे घराच घरपण,
स्त्री म्हणजे महान कार्य,
अशा या स्त्री शक्तीला
मानाचा मुजरा !
मानाचा मुजरा !!
मानाचा मुजरा !!!

**कु. ऋतुजा मोहतुरे**
बी.ए. भाग २

"आदिशक्तीतू प्रभूची भक्ती तू.
झाशीची राणी तु मावळ्याची भवानी तु
प्रयवांना लाभलेली उन्नती तु
आजच्या युगाची प्रगती तू"



# राजे



भरजरी वस्त्रापरी विणलेले, चरित्र तुमचे दिव्यत्वाची खाण
शिवराया हो तुमच्यासाठी मावळे उभे हे घेउनी मशाल ।।
राजस लोभस रूप गोजिरे, रत्न माणकांहुनी साजिरे
तिखट नजर तितकीच गहिरी, माया रयतेसाठी तीत भरे।
तुम्ही होतात म्हणून आमचं अस्तित्व, या महाराष्ट्राचं तुम्हीच सर्वस्व
तुमच्या स्मृतींनी उजळून जाईल, तरुणांचे हे अखंड जीवन
गडकिल्ले हे साक्ष देती, उज्ज्वल – यशस्वी इतिहासाची
तुमच्या पाऊली पावन झाली, माती ही या दुर्गावरची
कित्येक लढाया अन वादळे, अंगावर झेलती
दुर्ग जरी न डळमळे तरी कधीही, अभेद्य असे बुरुज तटबंदी ।।
तुमच्या आठवणी जपण्याचा, घेतला वसा हा दुर्गसंवर्धनाचा
शौर्याच्या रक्तरंजित गाथांचा, जागर होवो पुनः पुन्हां ।।
उठा मावळे पुन्हा करा रे, शिवगर्जना ती दुमदुमणारी निधड्या छातीवर पेलती,
अस्मानीची वादळे सारी पुन्हा सळसळूदे रक्त धमण्यांत, तेज तुझे आसमंत झाकोळू दे
संकल्प पूर्णत्वास नेण्यास, आई जगदंबे आशिर्वाद दे...
जय भवानी जय शिवाजी.

**महेश चांदोळे**
बी.ए. भाग १

# गोष्ट पहिल्या पावसाची

पहिल्या पावसात घर गळत होत
पण बाप माहा खळखळून हासत होता....
न जाणो त्या पावसात
माया बापाले कोणता देव दिसत होता...

चिंता आतुर असणारे अबोल डोळे त्याचे
आज बोलके झाले होते....
पावसाच्या सळसळत्या सरी सोबत
माया बापाचे सुद्धा डोळे ओले होते..

जी दोरी गळ्याला फास लावून घेण्यासाठी
बाप लपून ठेवायचा आज त्याच दोरीने
तो सरज्या राज्याला जुपत होता.
धन्य ती पहिल्या पावसाची पुण्याई

त्याच्या पायी माया बापातला देव माणुस
काळ्या आईला बी माय मानून पुजत होता
उन्हाच्या चटक्याने त्रासलेले सर्जा राज्याहि
आज पहिल्या पावसात डोलत होते..
न बोलणारे मुके जीव पण ते हि
मेघ राजासोबत मनसोक्त बोलत होते...

घरावरचे पत्र गळतांना त्याला
डांबर लावणारी शेतकरीण माय
भरल्या डोळ्यांनी पावसाकडे बघत होती.
रे वाचवल रे बाबा माया कपायाच कुंकू
मनून त्या पावसाचे आभार मानत होती.

अशी हि पहिल्या पावसाची गोष्ट
गावाकडे थोडी वेगळी
आपली माती आपल्या माणसासारखी असते.
मनून तर ते काय झाडी,
काय डोंगार, काय हॉटिल
समदं कस जघ मंदी हाय तशीच गुवाहाटी
आमच्या शेतकऱ्यायले
पहिल्या पावसात दिसते..........



**कु. आरती वानखडे**
बी.ए. भाग ३

## ।। फक्त तू खचू नकोस ।।

संधी मिळेल तुलाही,
लगेच तु हिरमसु नकोस,
आयुष्य खुप सुंदर आहे,फक्त तू खचु नकोस.
उठ आणि उघडून डोळे,
पहा जरा जगाकडे,
प्रत्येकाच्या आयुष्यात,
काहीतरी असतेच ना थोडे.
नाही नाही म्हणून,
उगाच कुढत बसु नकोस
आयुष्य खुप सुंदर आहे,फक्त तु खचू नकोस.
सामर्थ आहे हातात,
स्वप्ने डोळ्यात घेऊन चल
परिस्थितीशी भिडवून छाती
दोन हात करत चल
विजय तुझाच असेल तेव्हा
मागे वळून बघू नकोस
आयुष्य खुप सुंदर आहे,फक्त तु खचू नकोस.

**कु. गायत्री वानखडे**
**बी.ए. भाग १**



## आदर्श माता



एक दिवस तर साजरा कर स्वतःच्या अस्तित्वाचा
तू घेऊन उंच उंच भरारी रोशन कर दुनिया सारी
फिरून पाहू नकोस माघारी
तुझ्यात आहे शक्ती भारी
तूच आहेस सबला नारी
जन्मा येण्याचं कारण तू नात्यामधली गुंफण तू
आजच्या युगाची प्रगती तू
प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू
पेटव मशाली कर्तत्वाच्या
सिद्ध कर स्वतःला
एक दिवस तर साजरा कर स्वतःच्या अस्तित्वाचा
तू जागव तुझ्यातील जिजाई
बनून रहा समाजाची आई
तूच आहेस झाशीची राणी
तू आणू नकोस डोळ्यात पाणी
विषरूपी कोंदणातील अद्वितीय रत्न तूच आहेस
त्यागाची देवता तूच आहेस आदर्श माता

**कु. अनुराधा मुंडे**
**बी.ए. भाग १**

# जन्म दिला तू आई

तुच माझी आई तूच माझी माय
तुझ्या विना आई नाहि पाहू शकले
हे जिवन ।।धृ।।

रात्र न दिवस कष्ट करून दिले तु मला
हे चांगले जीवन कशी फेडीन उपकार
तुझे ते शब्दात ही सांगता येणार नाही ग ।।१ ।।


तु मला हा जन्म देवून दाखविले हे जग
तुझ्यासाठी आई आहे माझे हे जीवन।।२ ।।
तु जे केले आई नाही मी काधी ही विसरणार
तुझ्या सारख्या आईला कोटी कोटी प्रणाम ।।३ ।।



**कु. तेजस्विनी मैंद**
बी.ए. भाग २

# बाबा

बाबा तुम्ही म्हणजे नदी
जी कधीच आटत नाही
झरा जिच्या प्रेमाचा
तो कधीच गोठत नाही
तुमच्या मुळे आम्हाला
मिळे दुध तूप आणि लोणी
तुमच्या कष्टापुढे बाबा सारी
दुनिया छोटी किती
दगदग करता बाबा
पण कधीच बोलत नाही
जरी दुःख वेदना सहून
तुम्ही घेता आपल्या कुशीत
तुमची मांडी बाबा
आमच्या साठी उशी
झरा जिच्या प्रेमाचा
तो कधीच गोठत नाही



**कु. संजिवनी पवार**
बी.ए. भाग २

## स्वराज्य



माझ्याही शिवबांच एक राज्य होत,
जगाहून सुंदर अस ते स्वराज्य होत ।।
सुख शांती समाधान नांदत जिथे,
अस ते एक बहूजन स्वराज्य होत ।।
जाती धर्म पंथाचा भेदभाव नव्हता,
न्याय हा सर्वांसाठी एक समान होता ।।
न्यायासाठी प्राण गेला तरी चालेल,
पण अन्याय कुणावर झाला नव्हता ।।
राज्यांचा राज्य कारभार असा होता,
गवताची कडी सुद्धा गहाण नव्हती ।।
स्वतःसाठी सारेच जगतात या जगी,
रयतेसाठी जगणारे शिवराय होते ।।
स्वराज्यासाठी अर्पीले प्राण ज्यांनी,
अवघा महाराष्ट्र घडविला हो त्यांनी ।।
कितीही गुणगान केले तरी कमीच,
असे अमुचे छत्रपती शिवराय होते ।।

**शुभम नांदेडकर**
बी.ए. भाग १

## शुन्या पासुन विश्व

कर शुन्यातून विश्व निर्माण
होसील कधी तरी तु साकार
परिस्थितीला तोंड देत
दे जीवनाला नवा आकार
न घाबरता कर सामना
भिऊ नको तु अंधाराला
विश्व निर्माण करायच असेल
तर तारा होऊन चमक तु अंधाराला



**कु. स्नेहा गोरले**
बी.ए. भाग २

## श्रीमंत माणुस

येतांना एकटा येतो जातांना सुध्दा एकटा जातो
जातांना बरोबर काही नेणार नाही
तरीपण श्रीमंत होण्याचा अट्टाहास का करतो ?
सुखासाठी रात्रंदिवस झगडतो
दुःखात कोणीही सामील नसतो
आहारात सर्वकाही असते
पण तब्ब्येत साथ देत नसते तरीपण गर्व,
अहंकार करणेचा अट्टाहास का करतो ?
या जगात कोणी कोणाचा नसतो
भाऊ भावाचा वैरी असतो
पत्नी मुले दिखावा असतो
पापाचा कोणीही वाटेकरी नसतो
तरीपण नाते गोत्याचा अट्टाहास का करतो ?
गाडी बंगला सर्व काही असते
पण घरात सुख नसते
जन्म उदरात दिला तो माता
अंत होईल ती जागा माती
तरीपण मोठेपणाचा अट्टाहास का करतो ?

**कु. आरती वानखडे**
बी.ए. भाग ३



## फ्रेंडशिप

एक मुलगा आणि एक मुलगी बोलत असेल
किंवा सोबत असले तर लोक म्हणतात
त्यांच लफडं चालु आहे
अरे या जगात लफडी सोडून अनेक नाती आहेत
तुम्ही विचारही करत नाही आणि
अंदाज लावुन मोकळं होता
बॉयफ्रेंड आणि गर्लफ्रेंड हे नात सोडून
या जगात सर्वात श्रेष्ठ आणि पवित्र नात
कोणते असेल तर ते म्हणजे मैत्री आहे
अरे प्रत्येक मुलीला गर्लफ्रेंडच्या नात्याने
बोलण्याचा प्रयत्न करत असाल तर
ती तुम्हाला भाव पण देणार नाही
एखादया मुलीला एक हक्काची मैत्रीण
म्हणुन बोला आणि मग बघा स्वतः पेक्षा
जास्त प्रेम करेल तुमच्यावर
मैत्रीही खुप सुंदर,श्रेष्ठ आणि मनाला
आवडेल अस नात आहे
एकदा मुलीला गर्लफ्रेंड बनवण्यापेक्षा
तिला एक मैत्रिण म्हणुन विचारा
ती तुमची साथ आयुष्यभर देणार

**कु. मयुरी भाऊराव मडावी**
बी.ए. भाग ३



# कालचा आणि आजचा रावण



रावण जळत असताना रावणाने हसून गर्दीकडे बघितलं
तपासा स्वतःच्या चारित्र्याला मोठ्यानं त्यानं विचारलं.
केलाय मी गुन्हा सीतेचं अपहरण करण्याचा
प्रयत्न नाही केला मर्यादेची सीमा ओलांडण्याचा.
दिवसाढवळ्या रस्त्यावर अब्रूचे लचके तोडतात
सभ्यपणाचा आव दाखवून दरवर्षी मला जाळतात.
तुम्हा मानवां पेक्षा राक्षस ठरलो भारी
केला नाही अपमान सीतेचा माझ्या दारी.
हुंड्याच्या लालसेपोटी तुम्ही हजारो सीता जाळल्या
वंशाच्या दिवट्या साठी गर्भात कळ्या मारल्या.
हक्क नाही तुम्हांला मला बदनाम ठरवण्याचा
प्रयत्न करा तुम्हीं.. स्वतःचे चारित्र्य सुधारण्याचा!
तुमच्या समाधानासाठी दरवर्षी मला पेटवा..
पण पेटवण्याआधी तुमच्यातील राम मला दाखवा..

**कु. तृप्ती ठाकरे**
बी.ए. भाग १

# आमचे सर




हिरे सर......
ज्यांच्या ज्ञानाच्या वाहत जाई
सर्वत्र गंगेच्या धारा...
ज्यांच्या हृदय स्पर्शी बोलण्यामुळे
सुगंधीत वारा ज्यांच्या चटकन
शिकविण्यामुळे समजुन पडे
इतिहासाच सारा
ज्यांच्या वारंवार सांगण्यातून मिळे
एकच इशारा
शिक्षणाचा खरा उपयोग करून
संधीचे सोने करा..

जुकरे सर....
शिकवतात पण पटपट अभ्यासक्रम
संपविण्याची सर्वात जास्त त्यांची घाई
टेस्ट द्या सेमिनार घ्या असे त्यांचे म्हणणे
विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेण्याची
त्यांची तयारी त्यांनाच तर म्हणतात
जुकरे सर.......

गेडाम सर व सरतापे सर.....
ग्रंथालयातील पुस्तकांचा हिशोब
पाहतात जे सर..
ग्रंथालयातील शांतता राखुन
ठेवतात जे सर
ग्रंथालयात अभ्यासाची गोष्टीची नविन
पुस्तके जमवितात जे सर जे दोन सर
येताचं विद्यार्थीनी म्हणती पुस्तक
काढायचं आणि परत करायचं सर..

ठाकरे टिचर
टिचर कॉलेजमध्ये पाय टाकता
कॉलेज सर्व खुलून जाई
टिचर विद्यार्थीना ग्रामर शिकविता
विद्यार्थीनी साऱ्या रमून जाई
टिचर कॉलेजचे कोणतेही काम हाती घेता
काम चटकन संपून जाई
टिचर एळाद्या कार्यक्रमाची जबाबदारी घेता
कार्यक्रम चांगला पार पडून जाई



**कु. रंजना अंबुरे**
बी.ए. भाग ३

# कॉलेज लाईफ

दोन वर्षाचा प्रवास अवघ्या काही
दिवसांवर राहीला आहे हे ही
दिवस कसे निघुन जातील समजणारच नाही
शेवटच्या क्षणी प्रत्येकाच मन उदास असेल
आणि डोळ्यांमध्ये पाणी पण
तेव्हा आवठणीने सगळ्यांच मन
भरून येईल डोळ्यांत खुप आठवणी असणार
मित्र-मैत्रीणी सोबत केलेला दंगा मस्ती
आणि एपक्षेूरलश्रश ऊ्री सारख आठवणार
या कॉलेज ने खुप काही दिले
इथुन जातांना खुप आठवणी
घेऊन जाणार आहे
सगळेच दिवस खुप आठवणीत
राहणार आहेत नंतर काही दिवसांनी
काही वर्षांनी आम्ही पण असच म्हणु
गेले ते दिवस राहिल्या त्या फक्त आठवणी



**कु. आरती वानखडे**
**बी.ए. भाग ३**

# अजाण नातं

आयुष्यात काही क्षण
सोबत तुझे हवे आहे अबोल अशा क्षणी
बोलके शब्द तुझे हवे आहे.......
निरागस जीवनात साथ तुझी हवी आहे
या माझ्या काव्याला प्रतिसाद तुझा हवा आहे.
दुःखाच्या क्षणी डोळ्यातील अश्रू
झेलण्याकरिता ओंजळ तुझी हवी आहे
संकटकाळी हुंदके दाटतांना धैर्याची हाक
तुझी हवी आहे.. आयुष्य जगतांना
पाठिंबेची हाक तुझी हवी आहे
संकटात साथ तुझी हवी आहे
अपेक्षा अशी आहे दुसऱ्यापेक्षा संकटात
तुझ्याच मदतीचा हात हवा आहे......
जास्त काही नको दुःखद प्रसंगी
खुप झालं आता देशील का?
एवढं आता फक्त तुझ्याकडून उत्तर हवे आहे.



**कु. आरती वानखडे**
**बी.ए. भाग ३**

# मुलींनी वागावे तरी कसे

मनमोकळेपणाने समाजात वावरले तर
म्हणतात, पोरीला 'घरबंद' नाही.
शांत धीर गंभीरपणे वावरले तर म्हणतात
'फेस' करण्याची हिंमत नाही
लवकर लग्न केले तर म्हणतात
एखादे 'अफेअर' लपवायचे असेल.
लग्न उशिरा केले तर म्हणतात
मुलीत 'दोष' असेल
शिक्षण कमी घेतले तर, मागासलेली म्हणतात
शिक्षण जास्त झाले तर, टवाळखोर म्हणतात
मुलींनी या दुतोंडी जगात जगावे तरी कसे ?
निरपराध असताना मरावे तरी कसे ?



**कु. रंजना अंबुरे**
**बी.ए. भाग ३**

# शेतकरी गाथा



आले आभाळ चारीकडे दाटुन
शेतकरी राजा सुखात भारावुन
आले पाणी धो-धो स्वप्नाहुन
पिक आलं मस्त ठरासून
मोठी ही कृपा नवसाहून
घाम व श्रमाचे फळ सोन्याहून
देवाची लिला आम्हा साऱ्याहुन
पिक आलं अनमोल मोत्याहून
आला तो आशा मनात घेऊन
सरकारने भाव द्यावा पिक पाहून
अतोनात दुःख हृदयात साठवून
कोनी ना विचारे जवळून ना दुरून
लेकरा-बायांची काळजी करून करून
जातो तो आत्महत्येला पारहुन
धरतीच्च्या देह स्वाधीन करून
स्वर्गात जाता तो कष्ट करून
सर्व देवगण उभे राहुन नमस्कार करतो
त्यास मुजरा करून

**कु. रंजना अंबुरे**
**बी.ए. भाग ३**

# नौकरी

बडी हसीन होगी तु रे ! नौकरी
सारे युवा आज तुझपे ही मरते है
सुख चैन खोकर चटाई पर सोकर
सारी रात जगकर पन्ने पलटते है
दिन मे तहरी और रात को मैगी
आधे पेटही खाकर तेरा नाम जपते है
सारे युवा आज तुझपे ही मरते है
अंजान शहर में छोटा सस्ता रूम लेकर
किचन बेडरूम सब उसी में सहज कर
चाहत मे तेरी अपने माँ-बाप और
दोस्ती से दुर रहते है
सारे युवा आज तुझपे ही मरते है
राशन की गढरी सिरपे उठाये
अपनी मायुसी और मजबुरीयाँ खुद ही ठिपाये
खचाचच भरी ट्रेन में बिना टिकट
के रिस्क लेके आज सफर करते है
सारे युवा आज तुझपे ही मरते है
इंटरनेट अखबारों में तुझको तलाशते
तेरे लिए पत्र पत्रिकाओं पढते पढते
बत्तीस साल तक के जवान कुँवारे फिरते है
तु कितनी हसीन है रे ! नौकरी
सारे युवा आज तुझपे ही मरते है

**कु. प्रणिता उघडे**
**बी.ए. भाग ३**

# मैत्री

मैत्री म्हणजेच आनंद मैत्री म्हणजेच
जिवन मैत्री एक अशा भाग असतो
आपल्या जिवनाला पूर्ण बनवतो
क्षणा क्षणाचा साथी म्हणजेच
मैत्री चुकीला छळी
आनंदाला गुलाबाची पाखळी
दुःखाला आधाराची काठी अशी ती मैत्री
माझी मैत्री आयुष्याची तीजोरी
ज्यात अशा मैत्रीचा खजाना आहे
जो पैशा पेक्षाही अनमोल आणि किमती आहे
जी माझ्या आयुष्यभराची जमापुंजी आहे
जान है जहान है मैत्री मेरा
अभिमान है चाहे जो हो जाण
तु हमेशा हसती रहे और
औरो को भी हँसाती रहे



**कु. मयुरी भाऊराव मडावी**
**बी.ए. भाग ३**

# शेतकरी



विराट सतरा करोडात गेला
धोनी पंधरा करोडात गेला
जगाचा पोशिंदा मात्र
झाडावर लटकून मेला !!

भारत कृषीप्रधान की
क्रिकेटप्रधान हाच मोठा प्रश्न पडतो
सांगा जगाला काय मेला काय
कुणाला काय फरक पडतो !!

अरे एखादी मॅच तुम्ही
वावरात घेऊन पहा
शेतकऱ्याची जिंदगी
एकतरी दिवस जगुण पहा !

खेळाडू सारखे करोड़ नको
पिक मालाला भाव दया
कृषिरत्न कृषिभुषण नको
फक्त शेतकऱ्याला मान दया !!

कडाक्याचे ऊन असो
वा सोसाटयाचा वारा
किंवा बरसात असो
पावसाच्या ओल्याचींब धारा..

आमचा बळीराजा शेतात
दिवसभर राबतो
त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत
हे एक मागणे मागतो.

**कु. वैष्णवी भुसारी**
**बी.ए. भाग २**



## चारोळी

अर्थ शास्त्रज्ञ म्हणतात
व्यापारी लोकांमुळे देश चालतो,
पण लॉकडाऊनमुळे समजलं की
शेतात नांगर चालतो
तेव्हाच देश चालतो.

# ओवाळणी ...



दिदे, आज रक्षाबंधन ओवाळणी
म्हणून तुला काही द्याव तर
आज मीच तुला मागतो आहे..
आई-बाबांनी आपल्यासाठी
रक्ताच पाणी केल गं
तु विसरली असशील म्हणून
तुला सांगतो आहे..
तुझा भाऊ असून सुद्धा
बाबासारखे तुझे हट्ट पुरवण्यासाठी
परिस्थितीशी नेहमीच लढतो..
तरिपण तु क्षणिक प्रेमावर भाळते तु
आता तुच सांग छकूले
खरंतर मी कुठ कमी पडतो....
अगं, दीदे तुला जे हव ते
ओवाळणी म्हणून माग पण
माझ नाव जाईल ना असं वागू नको
मागशील तर काळीज सुद्धा ठेवील
तुझ्या तळहातावर पण
तुझ कन्यादान होण्याआधी
ते सुद्धा मागू नको...
अगं, चार चौघात ताठ मानेने चालतो
पण कधी मान खाली जाईल का?
याची मनात सतत भिती असते......
म्हणून अनोळखी मुलीकडे सुद्धा
वाईट नजरेने बघण्याची हिंमतच होत नाही
कारण प्रत्येक मुलीत मला तुच दिसते......
बस आता शेवटचं मागणे मागते
रक्षाबंधनाचा धागा जरा घट्ट बांध अन्
माझ्या या हातात तुझ्या रक्षणाचं बळ येवू दे.
कधी वाकड्या रस्त्यावर पाऊल जातांना
आई-बाबांचे झालेले हाल अन्
तुझ्या भावाने पुरवलेले लाडही
डोळ्याखालून जावू दे



**कु. प्रणिता सौदळे**
बी.ए. भाग २

## पाऊस

पाऊस येताच शेतकऱ्याचे तिफणं
हिरव सपान पाहतात
पाऊस येताचं
धरतीच्या कुशिमधील बी-बीयाणे उगवतात
पाऊस येताचं
मृदगंध सर्वत्र दरवळतात
पाऊस येताच
फुलून पिसारा मोर नाचतात
पाऊस येताच
डोंगर दऱ्या हिरवळतात
पाऊस येताच
नदी  नाले ओतपुत वाहतात
पाऊस येताच
धरतीवर स्वर्ग पसरवतो
म्हणूनच पावसाची किमया न्यारी
सारी श्रृष्टी त्याची वाट धरी



**कु. प्राची राऊत**
**बी.ए. भाग १**

## स्त्री



कधी मुलगी, कधी बहीण, पत्नी, कधी आई,
अशा अनेक भूमिका मी निभावते.....
पण या भूमिका निभावताना कधी कधी,
मी स्वतःला मात्र गमावते.
कधी आत्या, कधी मामा, काका, कधी दादा,
असे अनेक नातेवाईक मी कमावते,
पण या नात्यांच्या जाळ्यात कधी कधी,
मी स्वतःला मात्र हरवते.
कधी आई, कधी बाबा, पती, कधी मुलगा,
साऱ्यांच्या ईच्छांमधे आपले मन रमवते,
पण या सर्वांच्या ईच्छांमधे कधी कधी,
मी स्वतःची स्वप्न विसरते,
कधी मुलगी, कधी बहीण, पत्नी, कधी आई,
अशा अनेक भूमिका मी निभावते.......
पण या भूमिका निभावताना कधी कधी,
मी स्वतःला मात्र गमावते....

**कु. सानिका चवरे**
**बी.ए. भाग १**

# पाणी म्हणजे जीवन

पाणी म्हणजे जीवन त्याचा जपून वापर करा.
मुलांनो जपून वापर करा.
पाण्यावाचून आपल्या क्षण प्रत्येक आहे अपूरा,
म्हणूनच, तर त्याचा जपून वापर करा,
मुलांनो जपून वापर करा.
औषध घ्यायला पाणी हवे
जेवणानंतरही पाणी हवे
कपडे धुण्यास पाणी हवे
खेळून दमल्यास पाणीच हवे.
म्हणूनच तर त्याचा जपून वापर
करा मुलांनो जपून वापर करा.
प्रत्येक थेंब या पाण्याच्या जिवन
देई सजीवांना झाडे, पक्षी, फुले
फुलती मानवासही जीवन देती.
अशी महति या पाण्याची म्हणूनच
तर म्हणतो जपून वापर करा
मुलांनो जपून वापर करा.



**कु. प्राची आडे**
बी.ए. भाग १

# असे तेथे नाही

खूप खूप फुले त्यात फुललेली
जन्म जात किळलेली
काही कितपत खराब
पण मंद, पंगु,अपंग
असे तेथे नाही
किती किती रंग वाल्या फुलजाळ्या
पण जात,पात,धर्म,पंथ
असे तेथे नाही
निसर्गाच वेगळीच माया तुझे माझे
असा प्रश्नचं तेथे नाही

“
तुमची जुनी ओळख काहीही असली
तरी त्यावरून तुमच्या नशिबाचा
निर्णय होत नाही
तो होतो तुमच्या प्रयत्नांनी
”

**कु. जयश्री राठोड**
बी.ए. भाग १

# चंचल मन ...

चेहऱ्यात काय दिसतंय,
मन मोकळं करून दाखव,
हसणं असतं गालातल्या गालात,
ओठातले बोल बोलून दाखव
दिसत असलं तसं तरी,
अस्तित्व मात्र शोधून दाखव,
मुर्ती शोधून चालणार नाही
किर्ती कर्माने घडवून दाखव,
प्रेम कुणीही करत फुलांवर,
काट्यांना गोंजारून दाखवे,
कल्पना मोठी करून चालणार नाही,
थोडासा अनुभव घेऊन दाखव
दिसण्यासारखं खूप काही आहे
लपलेले गूण मात्र शोधून दाखव,
इतिहास घडलेला कुणीही सांगतं,
वर्तमानात मात्र जगून दाखव
विचार केला असेल भविष्याचा
सुरूवात आता तू करून दाखव
मनाचं मन पाखरू
शोधत आहे
मनाला स्थिर
करून दाखव ...



**कु. अमृता राठोड**
बी.ए. भाग १

# वाट पाहत आहे ...

ऐकलं आजकाल तूउदास उदास असतोस
खरं खरं सांग तू कोणत्या जगात जगतोस
चेहऱ्यावरील गोड हसू कूठे पळून गेलं
शांत मनाने विचार कर कोणी चोरून नेलं
स्वभावही म्हणे थोडा चिडचिडा झालाय
मन म्हणतं तुझ्याशिवाय किती कंटाळा आलाय
मन तुझं आता नाही कशात रमत
कोणीतरी चिडल्याशिवाय नाही तुला गमत
का दूर झाला तो प्रेमळ प्रेमळ जीवलग
कूठे तरी चूक झाली जरा आठवून बघ
चाकोरीतील जीवन आतातरी सोडून दे
इवल्याशा पंखात बळ भरून
मुक्त आकाशी झेप घे
जीवलग तुझा आहे मुक्त उडत आहे
आतुर नजरेने तुझी वाट पाहत आहे...



**कु. सुवर्णा नाटकर**
बी.ए. भाग २

# नातं मैत्रीचं

मैत्री म्हणजे काय रे दुधावरची साय रे
आपुलकींची उब मिलता सहज उतू जाय रे
मैत्री म्हणजे झूलूक चान्याची जणू ती असते
कुपीच पान्याची तिला असते गरज जपायची
एकदा सांडली तर वेचता नाही यायची
मित्र म्हणजे तलम शुभ्र वस्त्र
दुःखात होते आपुलकीचे पत्र
प्रसंगी होते शत्रूवर अस्त्र
परीक्षा देतात तेव्हा मैत्री आणि मित्र
मित्र म्हणजे काटयातील गुलाब बन
मित्र म्हणजे वाळवंटातील मधुबन
मैत्री आणि मित्र आहे दैवी देण
याच्यासारखं नाही कुठलं दुसरं लेणं
मैत्रीमधे मित्र रागवतातही चक्क
मैत्री म्हणजे निर्मळ पाणी जैसा रंग तैसी गाणी
मैत्री म्हणजे जणू स्वप्ननगरी
कधी कृष्णाची लडीवाळ बासरी
खरे मित्र नेहमीच दाखवतात चूका
मित्राच्या प्रगतीचा तो मार्ग सोपा
मित्र असतात निराशेत आशा
जे दाखवतात खरी योग्य दिशा
मैत्री म्हणजे सुदाम्याचे पोहे
सुख दुःख वाटुन घेतात दोघे
मैत्री म्हणजे हिरवे रान जिथे प्रेमळ गारवा छान
अहो, आपल्या माणसावर
रागावण्याचा आपलाच हक्क
मैत्री आहे एक सुंदर साज ज्याचा असतो
थाट ऐटबाज
मैत्रीत असतो निष्पाप भाव
हेव्यादाव्यांना नसतो जिथे बाच
मैत्रीत काही दयायचं नसतं घ्यायचं नसतं
मैत्रीत काही दयायचं नसतं घ्यायचं
नसतं ते एक फक्त ......
विश्वासाचं नातं असतं



**कु. साक्षी देशकरी**
बी.ए. भाग २

# धन्य जिजाऊ माता...



सांभाळीले तिने सर्वांना प्रेमाने
घडले स्वराज्य तिच्याच आशीर्वादाने।।
तिच्या मायेच्या छायेत नव्हता जाती धर्म
सर्व धर्म समभाव हे एकच तीचे कर्म ।।
तिच्याच राज्यात होती सुखी सारी प्रजा
धन्य धन्य जिजाऊ माता
धन्य धन्य शिवाजी राजा ।।
''अशी असावी माता
जिचा पाटावा अभिमान
पुत्र  घडविला ऐसा जो राष्ट्राची शान''....

**कु. प्रणिता चव्हाण**
बी.ए. भाग २

# माझे गाव

हे गाव आहे माझं
गावात चालते पंचायती राजं
गावात आहे हिरवागार निसर्ग
त्याला पाहुन मन होते दंग
मनाला वाटत व्हावं फुलपाखरू
गावात हिंडावं उडावं भिरुभिरु
पंचायत आहे गावात
भांडण झाल तर जातात पंचायतीत धावत
गावात आहे हिरवंगार रान
मेल तिथं निघत नाही तिथुन मन



**कु. श्रृष्टी अघम**
बी.ए. भाग १

## सुविचार

रात नाही ख्याब बदलते है।
मंजीक नही कारवा बदलता है।
जस्बा रखो जितने का,
क्योंक किस्तम बदले या ना बदले पर
वक्त जरूर बदलता है।

## सुविचार

*If you can't fly, then run*
*if you can't run, then walk*
*if you can't walk, then craw*
*but whatever you do, you have*
*to keep moving forwork*

## भुख



शोधावया भाकरीला निघाली ती भूक आहे..।।
जन्मताच गरीबी येते ही कुणाची चूक आहे..।।
भूक लागली की खाणे ही प्रकृती आहे..।।
भूक नसतांना खाणे ही विकृती आहे...।।
घासातील घास दुसऱ्याला देणे ही
मराठी माणसाची संस्कृती आहे ।।

**कु. राधिका उघळे**
बी.ए. भाग २

## भ्रष्टाचार

आज भ्रष्टाचार वाढला असा,मानवापेक्षाही जास्त
चालू लागला पैसा...
मतदारांना हवे असते वोट,
दारुड्याच्या खिश्यात म्हणून टाकली जाते नोट
सामान्य माणसाचं आयुष्य कठीण झालं
भ्रष्टाचार रुपी रावण जेव्हापासून या जगात आला
दुनियात काळाबाजार फैलू लागला
भ्रष्टाचार जागोजागी चालू लागला.

**कु. राखी इंगळे**
बी.ए. भाग २

## काहीतरी बाकी आहे !

जीवनाच्या या पुस्तकामध्ये
बरीच पाने लिहिली आहे
पण एक तेवढे तुझ्या नावाचे
शब्द लिहिणे बाकी आहे... ।।
निळ्या नभाच्या काळोख रात्री
चांदण जत्रा भरते आहे
एक चांदणी आपली
व्हावी हीच प्रार्थना बाकी आहे....।।
वाटेवरती दिसते रंग सोनेरी
दाट धुकेही आहे
सकाळच्या या प्रहरामध्ये
तुला भेटणे बाकी आहे.... । ।
लोकांच्या या गर्दीमध्ये
अनेक भेटी चालू आहे
माझ्यासाठी कोण असावा
त्याला पाहणे बाकी आहे...।।
लाख उधळले रंग गुलाबी
प्रेमाचा एक रंग बाकी आहे
हृदयाचे तीन कप्पे भरले
एक कप्पा बाकीच आहे.... ।।

**कु. राधिका देशमुख**
बी.ए. भाग २

# माझी बहीण

बाबांची लाडकी लेक
खायला आवडते तिला चॉकलेट केक
काम करतांना देते मला ती साथ
मी नसली घरी की पाहत बसते माझी वाट
चंचल ती फारच काम करते कोणतेही
झटपट अभ्यासाला बसताच
अभ्यासही करते पटपट.
केस तिचे लांब रंग तिचा गोरा
रागात येताच दाखविते ती तिचा तोरा.
स्वप्न आहे तिचे उंच भरारी घेण्याचे
मनी करते विचार ती उत्तम खेळाडू होण्याचे.
अशी आहे माझी धाडसी बहीण
सदैव मी तिच्या सोबत राहीन.

**कु. प्राची इंगोले**
बी.ए. भाग १

## सुविचार

तुम्ही जसा विचार करता तसे तुम्ही बनता.
यासाठी तुम्ही काय विचार करता
याकडे लक्ष असू द्या. शब्द हे गौण असतात,
विचार मात्र राहतात आणि तेच
दूरपर्यंत यात्रा करतात.

# जिवन जगून बघ

जमवून बघ जन्माला आला आहेस
थोडं जगून बघ,
जीवनात दुःख खूप आहे,
थोडं सोसून बघ !
चिमुटभर दुःखाने कोसळू नकोस,
दुःखाचे पहाड चढून बघ !
यशाची चव चाखून बघ,
अपयश येतं, निरखून बघ,
डाव मांडणं, सोपं असतं,
घरटं बांधणं सोपं असतं,
थोडी मेहनत करून बघ !
जगणं कठीण असतं,
मरणं सोपं असतं,
दोन्हीतल्या वेदना झेलून बघ !
जीवणं - मरणं एक कोडं असतं,
जाता एवढं सोडवून बघ !

**हरिओम जामोदे**
बी.ए. भाग १

# महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रमांसंबंधित बातम्या



## हर घर तिरंगा निमित्त रॅली

विदर्भ कल्याण / दारव्हा

## दत्तक ग्राम भुलाई येथे जनजागृती रॅली संपन्न

## रासेयो म्हणजे विद्या... सेवाभावी घळविणे...

## विविधबाबी संदर्भात जनजागृती रॅली व पथनाट्य सादर

सिंहझेप प्रतिनिधी

## महिला सबलीकरणावर जनजागृती

दारव्हा

सिंहझेप प्रतिनिधी

## वृद्धत्वदिनी हरसूलच्या वृद्धाश्रमास भेट

लोकसूत्र प्रतिनिधी

सागर जयसिंगपूरे

दारव्हा : जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील समाजशास्त्र विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय वृद्धत्वदिनाचे औचित्य साधून नागसेन मानकर वृद्धाश्रम हरसूल ता. दिग्रस येथील ... भेट देण्यात आली.

## माणिकराव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

देशोन्नती

## भुलाई येथे पशु चिकित्सा व लसीकरण शिबिर

देशोन्नती वृत्तसंकलन...

दारव्हा ■ स्थानिक नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर दत्तक ग्राम भुलाई येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे चालू असून या शिबिरांतर्गत पशु चिकित्सा व लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्याकरिता डॉ. मनीषा डोणेकर डॉ आंधळे डॉ अमोल तळोले डॉ सुरेश राठोड निलेश तैनात जया लाडोळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते. या कार्यक्रमांतर्गत गावातील एकूण १६५ पशुची चिकित्सा व लसीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ... जयवंत जुकरे ... बोरखडे चेतना ... राखी इंगळे वाणी ... साक्षी जाधव शुभम ... मैद जयश्री राठोड म... राठोड प्राची राऊत ... ऋतुजा मोहतुरे सुवर्णा ... पवार उमा दुमारे र... विशाखा कोल्हे वैष्णवी ... रोशन पवार राहुल उ... नांदेडकर महेश चांदोडे ... परिश्रम घेतले. (श.प्र.)

## वृक्षारोपण संपन्न

सिंहझेप प्रतिनिधी

दारव्हा – नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित जिजामाता कला महाविद्यालय दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आय क्यू एसी द्वारे वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षारोपणाचे ... करण्यात येऊन ... वृक्षांची लागवड करण्यात आली.

तर या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. जयवंत जुकरे डॉ. राजेश गेडाम डॉ.पुरुषोत्तम बाडे बाडे नितेश कदम सचिन माटोळे सतीश सरतापे विनोद कंठाळे राणी जाधव भाविका गोणेवार जयश्री राठोड हर्षा राठोड पायल राठोड राहुल डफळे हरी ओम ... जामोद अजय चव्हाण शुभम नांदेडकर माधुरी राठोड ... विशाखा कोल्हे प्राची इंगोले ... मानिका चौरे ...

## महिला दिनानिमित्त कार्यक्र...

दारव्हा

सिंहझेप प्रतिनिधी

स्थानिक नवसंजीवन शिक्षण ...सारक मंडळ दारव्हा द्वारा संचालित ...जामाता कला महाविद्यालय ...हा येथील राष्ट्रीय सेवा योजना ...मार्फत जागतिक महिला ... कार्यक्रमाचे आयोजन ... आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ...गातील ज्येष्ठ प्राध्यापक तथा ... प्रमुख डॉ. रमेश खंडारे ...ख मार्गदर्शक म्हणून प्रा. ...पे या उपस्थित होत्या. ... सुरुवात मान्यवरांच्या ...ले यांच्या प्रतिमेला ... करण्यात आली. ... यांनी जागतिक ...द्धतीने साजरा ...ी दिली तर ... विद्यालयीन संस्कृती टिकून ठेवण्याची ज... या दिनानिमित्त ठेवली पाहिजे ... मार्गदर्शन केले. या कार्य... संचालन वैशाली इंगोले हिने ... तर आयोजन तथा प्रास्ताविक ... सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रामधन हिरे यांनी केले, ... प्रदर्शन राधा उघडेनी या कार्यक्रमा... यशस्वीतेसाठी डॉ. जयवंत जुकरे ... राजेश गेडाम डॉ. प्रीती ठाकरे ... पुरुषोत्तम बांडे नितेश कदम स... माटोळे सतीश सरतापे विनोद कंठा... विशाखा कोल्हे दुर्गा पारधी कु. पू... बोरखडे चेतना वाघमारे प्राची आ... राखी इंगळे वाणी राठोड अमृता राठो... साक्षी जाधव शुभम नांदेडकर तेजस्विन... मैद जयश्री राठोड माधुरी राठोड पायल ... राठोड प्राची राऊत साक्षी देशकरी ... ऋतुजा मोहतुरे सुवर्णा नाटकर जयश्री ... पवार उमा दुमारे रवीना चव्हाण वैष्णवी ... दहिफळकर रोशन पवार राहुल उफा... हरीओम जामोदे ...

# महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम




माजी विद्यार्थी मेळावा -२०२३




पालक सभा -२०२३




स्थानिक स्वराज्य संस्था अभ्यास दौरा




करिअर मार्गदर्शन कार्यशाळा




वार्षिक युवा महोत्सव




वार्षिक युवा महोत्सव

## महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम



निरोप समारंभ -२०२३



सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट कार्यशाळा



पर्यावरण अभ्यास दौरा -२०२३



जागतिक एडस् दिन रॅली




युनिर्व्हसिटी युथ फेस्टिवल सहभाग



स्नेहभोजन

# महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम



महाविद्यालयीन खेळ व क्रिडा स्पर्धा



स्पर्धा परिक्षा अभ्यासिका कक्ष




नागसेन वृध्दाश्रमास भेट



युवा महोत्सव लोकनृत्यात सहभागी विद्यार्थीनींची चमू



आनंद मेळावा



कमवा आणि शिका उपक्रम

# महाविद्यालयात राबविण्यात आलेले विविध उपक्रम




नविन मतदार नोंदणी उपक्रम



व्हॉलीबॉल चमु सोबत प्रा. डॉ. खंडारे



आंतर महाविद्यालयीन खेळात सहभागी विद्यार्थी



महाविद्यालयीन खेळ महोत्सवात खो-खो खेळतांना विद्यार्थी




भारतीय संविधान जनजागृती रॅली




आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन रॅली


नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा
बी.ए.भाग अंत्य वर्गाकरिता
निरोप समारंभ


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्पर्धा पर
मार्गदर्शन कार्य
दि. २२ मार्च २०२३






नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालीत (रं.न.एफ १५६२)
जिजामाता कला महाविद्यालय


राष्ट्रीय सेवा योजना





## आमचे प्रेरणास्थान



**मा. आमदार श्री. माणिकरावजी ठाकरे**

संस्थापक अध्यक्ष, नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा
माजी गृह तथा उर्जा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
विद्यमान सदस्य विधान परिषद महाराष्ट्र राज्य

